2

# Current Global Reviewer

UGC Approved International Research Refereed Journal For All Subjects & All Languages

ISSN 2319-8648 | Impact Factor - 2.143 | UGC Approved Sr. No. 64310

SPECIAL ISSUE

(24th & 25th Jan. 2018) Issue-II , Volume I,

On the Occasion of ICSSR SPONSORED Two Day National Conference On

# Impact of Climate Change on Agriculture

Organized by

Department of Geography,
Vasundhara College, Ghatnandur,
(NAAC Accridited 'B' Grade)
Tq. Ambajogai, Dist. Beed (M.S.)



Editor in Chief
Mr. Arun Godam

Guest Editors
Principal Dr. Arun Dalve
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai, Dist. Beed (MS)

...mare
...ography
...atnandur

Asstt. Prof. Govind Zadke
Dept. of Geography
Vasundhara College, Ghatnandur

www.rjournals.co.in

CamScanner

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue
Issue 11 ,Vol 1 , 24th & 25th Jan. 2018
UGC Approved
Sr. No. 64310
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 2.143

# VASUNDHARA COLLEGE, GHATNANDUR

NAAC Accredited 'B' Grade with CGPA 2.47.

DEPARTMENT OF GEOGRAPHY

Organized

2nd National Conference on

# IMPACT OF CLIMATE CHANGE ON AGRICULTURE

(24th & 25th Jan. 2018)

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Editors
**Principal Dr. Arun Dalve**
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist. Beed (MS)

**Convener & Editor**
**Dr. Sakharam Waghmare**
Head, Department of Geography
Vasundhara College, Ghatnandur

**Co- Convener**
**Assit. Prof. Govind Zadke**
Dept. of Geography
Vasundhara College, Ghatnandur



CS CamScanner

**Current Global Reviewer**

Special Issue
Issue 11 ,Vol 1 , 24th & 25th Jan. 2018 | UGC Approved Sr. No. 64310 | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 2.143


| | | | |
|---|---|---|---|
| 70 | उद्योगों में जल की, माँग एक भोगोलिक अध्ययन | डॉ. शेख ए.आय. | 177 |
| 71 | मराठी साहित्यातील हवामान बदल आणि कृषि चित्रणे | प्रा.अनिता महादेव भद्रे | 179 |
| 72 | वातावरण बदलाचा नांदेड जिल्ह्यातील कापूस आणि सोयाबीन पीकांवर झालेल्या परिणामाचा अभ्यास: सन २००१ ते २०१४ | डॉ. एन. एन. मूंढे, अभय विष्णू मनसरे | 183 |
| 73 | सोलापूर जिल्ह्यातील पीक प्रारूपातील बदलाचा भौगोलीक अभ्यास | प्रा.गायकवाड सुभाष माणिकराव, डॉ.एच.एन.रेडे | 187 |
| 74 | भारतातील लोकसंख्या विस्फोट: सामाजिक व आर्थिक परिणाम | प्रा.डॉ. वाघमारे हरी साधू | 190 |
| 75 | अंबाजोगाई तालुक्यातील सेवा–सुविधेचा (ग्रामीण वस्तीतील) चिकित्सक अभ्यास | डॉ.संजीव कोळपे प्रा. नागेश कराळे | 195 |
| 76 | महाराष्ट्रातील उपयुक्त जलसाठे व जलसिंचनासाठी पाणचा वापर : एक भ्यास | डॉ. एन.के. वाघमारे | 198 |
| 77 | वातावरणातील वदल आणि भारतीय शेती : एक चिकित्सा | डॉ.संजीव कोळपे | 203 |
| 78 | भारतीय कृषी : आणि उपाय | अशोक शहाजी भालेराव | 208 |
| 79 | जालना जिल्ह्यातील कृषी भूमी उपयोगाचा भौगोलीक अभ्यास | प्रा. डॉ. पीसाळ एच.जी., प्रा. घोडके जे. व्ही., प्रा. अनिल प्रकाश वाघ | 212 |
| 80 | महाराष्ट्रातील जलसिंचनाचे प्रकार व पद्धती आणि जल नियोजनाची टंचाई यांचा भौगोलिक अभ्यास | प्रा.डॉ. देवकर भाऊसाहेब सोनाजी | 215 |




CamScanner

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue
Issue II, Vol I, 24th & 25th Jan. 2018
UGC Approved
Sr. No. 64310
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 2.143

# अंबाजोगाई तालुक्यातील सेवा–सुविधेचा (ग्रामीण वस्तीतील) चिकित्सक अभ्यास

डॉ.संजीव कोळपे
भूगोल विभाग
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गंगाखेड.

प्रा.नागेश कराळे
सरस्वती महाविद्यालय, केज

--------------(75)--------------

सारांश :

प्रस्तुत अभ्यास क्षेत्रातील अंबाजोगाई तालुक्यातील ग्रामीण वस्तीतील सेवा–सुविधांचा अभ्यास करण्यात आला आहे. मानवी जीवनात जसे वस्तीला महत्वाचे स्थान आहे. तसेच वस्तीतील सेवा–सुविधांना महत्व आहे. ग्रामीण वस्तीत सुयोग्य, मुबलक सेवा–सुविधा नसतील तर ती वस्ती लोकांच्या दृष्टिने अयोग्य समजली जाते. दर्जेदार सेवा–सुविधा हे वस्तीच्या उत्कर्षाचे प्रतिक मानले जाते. प्रस्तुत शोध–निबंधामध्ये जिल्हा जनगणना अहवाल 1991 आणि जिल्हा आर्थिक आणि सामाजिक समालोचन यातून आकडेवारी घेतली आहे. त्यावर संस्करण करुन ग्रामीण वस्तीतील उपलब्ध सेवा–सुविधा आणि अपेक्षित सेवा–सुविधा यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. अंबाजोगाई तालुक्यातील लोकसंख्येला अनुसरुन आठवडी बाजाराची सुविधा आणि पाणी पुरवठ्याची सुविधा यांचा तालुक्यातील मंडळानुसार आढावा घेण्यात आला आहे.

बीज संज्ञा : ग्रामीण लोकसंख्या, उपलब्ध सेवा–सुविधा, अपेक्षित सेवा–सुविधा.

प्रस्तावना :

ग्रामीण वस्तीच्या सामाजिक, आर्थिक, राजकिय आणि सांस्कृतिक दृष्टिकोणातून सेवा–सुविधांना महत्वाचे स्थान आहे. देशातील विविध भागाचा विचार केला तर जेथे जिवनावश्यक सुविधा मुबलक, उत्कृष्ट असतील तेथे लोकसंख्येचे केंद्रीकरण जास्त आढळते. तसेच तेथील लोकांचे जीवनमान उंचावलेले दिसून येते. त्याबरोबरच सामाजिक व सांस्कृतिक प्रगती दिवसेंदिवस वाढत असलेली दिसते. अंबाजोगाई तालुक्यातील मंडळनिहाय सेवा–सुविधांचा अभ्यास करताना परळी, घाटनांदूर अंबाजोगाई आणि वर्दापूर मंडळात वैद्यकीय सुविधा आणि डाक कार्यालयाच्या सेवा–सुविधामध्ये विविधता आढळते. या विभागातील सुविधा कांही ठिकाणी उच्च कांही ठिकाणी मध्यम ते निम्न आणि कांही ठिकाणी असमाधानकारक आढळून येतात.

प्रस्तुत अभ्यास क्षेत्रातील उपलब्ध असलेल्या सेवा–सुविधेची संख्या आणि लोकसंख्येच्या दृष्टिने ग्रामीण वस्तीत अपेक्षित असलेल्या सेवा–सुविधेची संख्या यांचा सांख्यकिय पध्दतीचा वापर करुन चिकित्सक आढावा घेण्यात आला आहे.

उदिष्ट : प्रस्तुत शोध–निबंधात ग्रामीण वस्त्यातील सेवा–सुविधांचा अभ्यास करणे.

अभ्यास क्षेत्र :

मराठवाड्यातील औरंगाबाद विभागाच्या केंद्रस्थानी असलेल्या बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्याची निवड अभ्यासासाठी केली असून येथील सेवा–सुविधेचा चिकित्सक आढावा घेण्यात आला आहे. अंबाजोगाई तालुक्याचा भौगोलिक दृष्टिकोणातून विचार केला तर हा तालुका गोदावरी व सिंदफना नद्यांच्या खो–यात वसलेला आहे. या तालुक्याची समुद्र सपाटी पासूनची उंची 400 ते 450 मी. पर्यंत आहे. अंबाजोगाई तालुक्याचा अक्षवृत्तीय विस्तार 18° 51′ उत्तर ते 19° 18′ उत्तर अक्षवृत्ता दरम्यान तरे रेखावृत्तीय विस्तार 75° 50′ पूर्व ते 76° 28′ पूर्व रेखावृत्ता दरम्यान आहे. अंबाजोगाई तालुक्याचे क्षेत्रफळ 1686.1 चौ.कि.मी. असून सध्या तालुक्यातील वस्त्यांची संख्या 199 असून 1991 च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या 2,38,083 इतकी आहे. अंबाजोगाई तालुक्यात एकूण 05 मंडळ आहेत. यामध्ये परळी, घाटनांदूर, अंबाजोगाई आणि वर्दापूर मंडळाचा समावेश होतो.

ग्रामीण वस्त्यातील सेवा–सुविधा :

जनगणना वर्ष 1991 च्या आकडेवारीच्या आधारे अंबाजोगाई तालुक्यातील ग्रामीण वस्त्यातील सेवा–सुविधेचा मंडळनिहाय अभ्यास करण्यात आला आहे. ग्रामीण वस्त्यामध्ये उपलब्ध असलेल्या खालील सुविधांच्या क्षमतेची गणना करुन श्रेणी निश्चित केली आहे.

अंबाजोगाई तालुका
सेवा–सुविधा

| अ.क. | सेवा–सुविधा |
|---|---|
| 1. | आठवडी बाजाराची सुविधा |
| 2. | पाणी पुरवठ्याची सुविधा |


© Shaurya Publication, Latur | www.rjorunals.co.in | Email-hitechresearch11@gmail.com
CamScanner

ग्रामीण वरत्यातील सेवा–सुविधेचे वितरण :

पुढील सुत्राचा उपयोग ग्रामीण वरत्यातील सेवा–सुविधेच्या क्षमतेची निश्चिती करण्यासाठी केला आहे. सुत्राच्या आधारे अंबाजोगाई तालुक्यातील मंडळनिहाय ग्रामीण वरत्यांतील सेवा–सुविधांचे उच्च सुविधा, मध्यम

$$Xie = \frac{Pi}{mp}$$

जसे, Xie – मंडळातील सेवा–सुविधांची अपेक्षित संख्या

Pi – मंडळातील एकूण ग्रामीण लोकसंख्या

mp – तालुक्यातील प्रति एका सुविधेवर अवलंबून असलेली लोकसंख्या

$$mp = \frac{P}{Fi}$$

जसे, P = तालुक्यातील एकूण लोकसंख्या

Fi = प्रत्येक एका सेवा–सुविधांची एकूण संख्या

सुविधा, निम्न सुविधा आणि असमाधानकारक सुविधा अशा चार गटामध्ये क्षमतेनुसार वर्गीकरण केले आहे.

सारणी कमांक–1

अंबाजोगाई तालुका (1991)

ग्रामीण वस्त्यातील सेवा–सुविधेचे वितरण

| अ.क. | मंडळ | आठवडी बाजार | पाणी पुरवठा |
|---|---|---|---|
| 01 | परळी | 02 | 38 |
| 02 | घाटनांदूर | 03 | 46 |
| 03 | अंबाजोगाई | 03 | 34 |
| 04 | बर्दापूर | 02 | 28 |

स्त्रोत : संशोधकाने आधिकृत माहितीच्या आधारे संकलित केले आहे.

1.1– आठवडी बाजाराची सुविधा :

ग्रामीण वरत्यामध्ये आठवडी बाजाराची सुविधा हा महत्वाचा घटक असून सद्य स्थितीमध्ये ग्रामीण वरतीत ब–याच ठिकाणी आठवडी बाजाराची सुविधा असल्याचे दिसते. अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण वस्तीमध्ये आठवडी बाजाराची संख्या अंबाजोगाई तालुक्यात 10 एवढी आहे. एका आठवडी बाजारावर 21467.6 एवढी ग्रामीण ग्रामीण लोकसंख्या आवलंबुन आहे. अभ्यास क्षेत्रातील मंडळनिहाय एकूण ग्रामीण वस्तीतील उपलब्ध असलेली आठवडी बाजाराची संख्या आणि एकूण ग्रामीण लोकसंख्या याचा विचार करुन अपेक्षित आठवडी बाजाराची संख्या सुत्राच्या सहाय्याने काढली आहे. त्या आधारे मंडळनिहाय ग्रामीण वस्तीचे विभाजन आठवडी बाजाराची उच्च सुविधा, मध्यम सुविधा, निम्न सुविधा आणि असमाधानकारक सुविधा अशा चार गटामध्ये वर्गीकरण करुन केले आहे. अभ्यास क्षेत्रातील मंडळनिहाय एकूण ग्रामीण वस्तीमध्ये उपलब्ध आठवडी बाजाराची संख्या आणि अपेक्षित आठवडी बाजाराची संख्या सारणी कमांक 1.1 मध्ये दर्शविलेली आहे.

सारणी कमांक –1.1

अंबाजोगाई तालुका (1991)

ग्रामीण वस्त्यातील सेवा–सुविधेचे वितरण

| अ.क. | मंडळ | आठवडी बाजाराची उपलब्ध संख्या | आठवडी बाजाराची अपेक्षित संख्या |
|---|---|---|---|
| 01 | परळी | 02 | 02 |
| 02 | घाटनांदूर | 03 | 03 |
| 03 | अंबाजोगाई | 03 | 02 |
| 04 | बर्दापूर | 02 | 03 |
| तालुका एकूण | | 10 | 10 |

स्त्रोत : संशोधकाने आधिकृत माहितीच्या आधारे संकलित केले आहे.

अंबाजोगाई तालुक्यात एकूण उपलब्ध आठवडी बाजाराच्या संख्येपैकी सर्वात जास्त आठवडी बाजाराची संख्या घाटनांदूर मंडळातील एकूण ग्रामीण वस्तीमध्ये 03 इतकी आहे. त्या खालोखाल अंबाजोगाई मंडळात 03, परळी मंडळात 02 आणि बर्दापूर मंडळात 02 एवढी असल्याचे पाहावयास मिळते. तर या तालुक्यात अपेक्षित आठवडी बाजाराची संख्या ग्रामीण लोकसंख्येला अनुसरुन अपेक्षित आठवडी बाजाराची संख्या अनुक्रमे परळी मंडळात 02 आणि घाटनांदूर मंडळात 03 एवढी असून ती उपलब्ध संख्येएवढी आहे. त्यामुळे येथील ही सुविधा मध्यम स्वरुपाची आहे. तर अंबाजोगाई मंडळात 02

एवढी असून ती उपलब्ध संख्येपेक्षा कमी आहे. त्यामुळे येथील ही सुविधा उच्च स्वरुपाची आहे. बर्दापूर मंडळात 03 एवढी असून ती उपलब्ध संख्येपेक्षा जास्त आहे. त्यामुळे येथील आठवडी बाजाराची ही सुविधा असमाधानकारक स्वरुपाची असल्याचे आढळून येते.

1.2– पाणी पुरवठ्याची सुविधा :

ग्रामीण वस्त्यामध्ये पाणी पुरवठ्याची सुविधा हा महत्वाचा घटक असून सद्य स्थितीमध्ये ग्रामीण वस्तीत पाणी पुरवठ्याची सुविधा असल्याचे दिसते. अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण वस्तीमध्ये एकूण पाणी पुरवठ्याची संख्या अंबाजोगाई तालुक्यात 146 एवढी आहे. एका पाणी पुरवठ्याच्या सुविधेवर 1470.38 एवढी ग्रामीण लोकसंख्या आवलंबुन आहे. अभ्यास क्षेत्रातील मंडळनिहाय एकूण ग्रामीण वस्तीतील उपलब्ध असलेली पाणी पुरवठ्याची संख्या आणि एकूण ग्रामीण लोकसंख्या याचा विचार करुन अपेक्षित पाणी पुरवठ्याची संख्या सुत्राच्या सहाय्याने काढली आहे. त्या आधारे मंडळनिहाय ग्रामीण वस्तीचे विभाजन पाणी पुरवठ्याची उच्च सुविधा, मध्यम सुविधा, निम्न सुविधा आणि असमाधानकारक सुविधा अशा चार गटामध्ये वर्गीकरण करुन केले आहे. अभ्यास क्षेत्रातील मंडळनिहाय एकूण ग्रामीण वस्तीमध्ये उपलब्ध पाणी पुरवठ्याची संख्या आणि अपेक्षित पाणी पुरवठ्याची संख्या सारणी कमांक 1.2 मध्ये दर्शविलेली आहे.

सारणी कमांक –1.2
अंबाजोगाई तालुका (1991)
ग्रामीण वस्त्यातील सेवा–सुविधेचे वितरण

| अ.क. | मंडळ | पाणी पुरवठ्याच्या सुविधेची उपलब्ध संख्या | पाणी पुरवठ्याच्या सुविधेची अपेक्षित संख्या |
|---|---|---|---|
| 01 | परळी | 38 | 34 |
| 02 | घाटनांदूर | 46 | 40 |
| 03 | अंबाजोगाई | 34 | 35 |
| 04 | बर्दापूर | 28 | 37 |
| तालुका एकूण | | 146 | 146 |

स्त्रोत : संशोधकाने आधिकृत माहितीच्या आधारे संकलित केले आहे.

अंबाजोगाई तालुक्यात एकूण उपलब्ध पाणी पुरवठ्याच्या संख्येपैकी सर्वात जास्त पाणी पुरवठ्याची संख्या घाटनांदूर मंडळातील एकूण ग्रामीण वस्तीमध्ये 46 इतकी आहे. त्याखालोखाल परळी मंडळात 38, अंबाजोगाई मंडळात 34 आणि बर्दापूर मंडळात 28 एवढी असल्याचे पाहावयास मिळते. तर या तालुक्यात अपेक्षित पाणी पुरवठ्याची संख्या ग्रामीण लोकसंख्येला अनुसरुन अपेक्षित पाणी पुरवठ्याची संख्या अनुकमे घाटनांदूर मंडळात 40 आणि परळी मंडळात 34 एवढी असून ती उपलब्ध संख्येपेक्षा कमी आहे. त्यामुळे येथील सुविधा उच्च असल्याचे आढळून येते. अंबाजोगाई मंडळात 35, बर्दापूर मंडळात 37 एवढी असून ती उपलब्ध संख्येपेक्षा जास्त आहे. त्यामुळे येथील ही सुविधा असमाधानकारक स्वरुपाची असल्याचे आढळून येते.

निष्कर्ष :

अंबाजोगाई तालुक्यात ग्रामीण लोकसंख्येला अनुसरुन अपेक्षित आठवडी बाजाराची संख्या अनुकमे परळी मंडळात 02 आणि घाटनांदूर मंडळात 03 एवढी असून ती उपलब्ध संख्येएवढी आहे. त्यामुळे येथील ही सुविधा मध्यम स्वरुपाची आहे. तर अंबाजोगाई मंडळात 02 एवढी असून ती उपलब्ध संख्येपेक्षा कमी आहे. त्यामुळे येथील ही सुविधा उच्च स्वरुपाची आहे. बर्दापूर मंडळात 03 एवढी असून ती उपलब्ध संख्येपेक्षा जास्त आहे. त्यामुळे येथील आठवडी बाजाराची सुविधा वाढविण्याची गरज आहे. त्यामुळे ही सुविधा असमाधानकारक स्वरुपाची आहे.

अंबाजोगाई तालुक्यात ग्रामीण लोकसंख्येला अनुसरुन अपेक्षित पाणी पुरवठ्याची संख्या अनुकमे घाटनांदूर मंडळात 40 आणि परळी मंडळात 34 एवढी असून ती उपलब्ध संख्येपेक्षा कमी आहे. त्यामुळे येथील ही सुविधा उच्च स्वरुपाची आहे. तर अंबाजोगाई मंडळात 35, बर्दापूर मंडळात 37 एवढी असून ती उपलब्ध संख्येपेक्षा जास्त आहे. त्यामुळे येथील पाणी पुरवठ्याची ही सुविधा असमाधानकारक स्वरुपाची आढळून येते.

संदर्भ ग्रंथ :

1. अहिरराव वा.र. (1997) : अधिवास भूविज्ञान, निराली प्रकाशन पुणे.
2. रोडे सोमनाथ (1999) : मराठवाड्याचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगापूरा, औरंगाबाद.
3. भारतीय जनगणना अहवाल, 1981, 1991, 2001.
4. बीड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, 2005, 2008.
5. बीड जिल्हा गॅझेटर.



CS CamScanner